



दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर  संचालक-संपादक : अजय बिवडे



Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, २८ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५८ | किंमत : २ रूपये



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# महापुरातील मृतांचा आकडा २७० वर

## २८८ भारतीय बेपत्ता, २१ जणांचा लागला शोध



**वृत्तसंस्था, काठमांडू**
नेपाळ आणि लगतच्या तिबेट भागात आलेल्या विनाशकारी महापुरामुळे आतापर्यंत मृत्युमुखी पडलेल्यांच्या आकड्यात वाढ झाली असून आतापर्यंत २७० जणांचे मृतदेह हाती लागले आहेत. अद्याप २८८ भारतीय नागरिक बेपत्ता असून गेल्या २४ तासात फक्त २१ भारतीयांचा शोध लागला आहे.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, सुरक्षित बाहेर काढण्यात आलेले २१ नागरिक तामिळनाडूचे असून त्यांना मायदेशी परत आणण्याची प्रक्रिया सुरू आहे. बेपत्ता असलेल्या २८८ भारतीयांमध्ये नेपाळमधील त्रिशुली जलविद्युत प्रकल्पात काम करणाऱ्या ७३ कामगारांचा समावेश आहे. चीनच्या तिबेट सीमेवरही अनेक भारतीय अडकले आहेत. २०० हून अधिक भारतीयांनी मदतीची मागणी केली असून त्यापैकी ९५ जण सध्या दार्चेन भागात सुरक्षित आहेत.

नेपाळच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संपूर्ण आपत्तीची तीव्रता अद्याप तपासली जात आहे. नेपाळ आणि तिबेट मिळून सुमारे ८०० परदेशी नागरिकांसह जवळपास १,५०० लोक बेपत्ता आहेत, तसेच हजारो कुटुंबे बेघर झाली आहेत. तेथे सध्या युद्धपातळीवर बचावकार्य राबवले जात आहे.

# एकाच कुटुंबातील चौघांची आत्महत्या

## धावत्या ट्रेनसमोर उडी मारली



**वृत्तसंस्था, जळगाव**
जळगावमध्ये एकाच कुटुंबातील चौघांनी सामूहिक आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. आई-वडीलांनी दोन मुलांना घेऊन धावत्या ट्रेनसमोर उडी मारत आयुष्य संपवलं. या घटनेमुळे जळगाव हादरले. घटनेची माहिती मिळताच अमळनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

चौघांचे मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतले असून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले आहे. पोलिस सध्या या सामूहिक आत्महत्या प्रकरणाचा तपास करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जळगावच्या अमळनेर तालुक्यातील टकरेखेडा येथे आज पहाटे ही घटना घडली. सुनील अमृत भिल आणि त्यांची बायको पार्वती सुनील भिल यांनी आपल्या दोन चिमुकल्या मुलींसह रेल्वेसमोर उडी मारली.

या घटनेत गंभीर जखमी झालल्या नवरा-बायकोसह दोन मुलींचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या शरीराचे अक्षरशः तुकडे झाले. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अमळनेर पोलिसांकडून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

### थोडक्यात

## १ सप्टेंबरपासून दूध ९ रुपयांनी महागणार!

**मुंबई :** दुधाळ जनावरांच्या वाढत्या किमती तसेच पशुखाद्याच्या दरात झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर मुंबई दुग्ध उत्पादक संघाने दुधाच्या घाऊक दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दुधाचा सध्याचा घाऊक दर प्रतिलिटर ९३ रुपयांवरून १०२ रुपये करण्यात येणार आहे. मुंबईत हे नवे दर १ सप्टेंबर २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत लागू राहणार आहेत, अशी माहिती संघाचे अध्यक्ष चंद्रकुमार सिंग यांनी दिली. जोगेश्वरी येथील दिवाण सेंटर सभागृहात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत दुधाळ जनावरांच्या वाढत्या किमतींबरोबरच दाणा, तूरचुणी, चणाचुणी आदी पशुखाद्यांच्या दरात २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच चारा, पेंड आदींच्या किमतीतही वाढ झाल्याने दूध उत्पादकांवर आर्थिक भार पडत असल्याचे सांगण्यात आले. या वाढत्या उत्पादन खर्चाचा विचार करून हा दर प्रतिलिटर ९ रुपयांनी वाढवून १०२ रुपये करण्यात आला असून, दूध उत्पादकांना वाढत्या खर्चातून दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मुंबई दुग्ध उत्पादक संघाकडून स्पष्ट करण्यात आले.



# मोमोज खाल्ल्याने १६ जणांना विषबाधा



**वृत्तसंस्था, मुंबई**
कुर्ला पश्चिमेकडील सुंदरबाग परिसरात मोमोज खाल्ल्यानंतर १६ जणांना फूड पॉइझनिंगचा त्रास झाल्याची घटना समोर आली आहे. उलट्या, जुलाब, ताप, पोटदुखी आणि चक्कर येण्याचा त्रास सुरू झाल्यानंतर त्यांना कुर्ला येथील भाभा रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले. यापैकी १४ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, दोघांवर बा रुग्ण विभागात (ओपीडी) उपचार करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य समितीचे अध्यक्ष हरिष भांदिर्गे यांनी भाभा रुग्णालयाला भेट देऊन रुग्णांची विचारपूस केली. तसेच डॉक्टर आणि रुग्णालय प्रशासनाकडून रुग्णांची प्रकृती व सुरू असलेल्या उपचारांची माहिती घेतली.

# हा देश म्हणजे धर्मशाळा नाही : अमित शहा

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
२०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे ध्येय मजबूत देशांतर्गत सुरक्षेच्या पायावरच अवलंबून आहे, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. दिल्लीत इंटेलिजन्स ब्युरोच्या राष्ट्रीय सुरक्षा रणनीती परिषदेच्या निरोप सत्रात बोलताना शहांनी घुसखोरी, दहशतवाद, मादक पदार्थांची तस्करी आणि सुरक्षा आव्हानांविरुद्ध आवश्यक पावले उचलण्याचे आवाहन केले.



देशांतर्गत सुरक्षा अधिक मजबूत केल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. पूर्वीच्या सरकारांनी अमली पदार्थांची तस्करी, नक्षलवाद आणि ईशान्येकडील असंतोष यासारख्या आव्हानांचा ते विकोपाला जाण्यापूर्वीच अंदाज लावला असता, तर आज देशाला अनेक दशकांच्या सुरक्षा आणि प्रशासकीय आव्हानांचा सामना करावा लागला नसता, असे शहा म्हणाले. तीन मोठ्या अंतर्गत सुरक्षा हॉटस्पॉट्समुळे निर्माण झालेल्या धोक्यांवर भारताने यशस्वीरीत्या मात केली असल्याचे शहा म्हणाले. त्यांनी या यशाचे श्रेय राज्य पोलिस दल, केंद्रीय यंत्रणा आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांना दिले.

### राष्ट्रीय सुरक्षा रणनीती परिषदेला महत्त्वाचे आवाहन

गुप्तचर आणि सुरक्षा यंत्रणांना पुढील १५ ते २० वर्षांत देशाच्या सुरक्षा वातावरणाला आकार देऊ शकणाऱ्या ट्रेंड्सवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन शहांनी केले. भविष्यातील आव्हाने ओळखून त्यांचे मोठ्या संकटात रूपांतर होण्यापूर्वीच ती मोडून काढण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा रणनीती परिषदेने खबरदारी घ्यावी असेही शहा म्हणाले.

पुढील एका वर्षाच्या आत तीन नवीन गुन्हेगारी कायदे पूर्णपणे लागू करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. या सुधारणांमुळे गुन्हेगारी खटले सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरापर्यंत तीन वर्षांच्या आत निकाली निघू शकतील आणि शिक्षेचा दर २५ टक्क्यांनी वाढेल, अशा प्रकारे रचना करण्यात आली आहे, असेही शहा यांनी स्पष्ट केले.

# पेपरफुटीला सत्ताधारी जबाबदार, विजय वडेट्टीवार यांचा आरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असून आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा पेपर लव्ह स्टोरीमध्ये फुटलेला नाही तर यात सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

एमपीएससीच्या वर्ग-१ आणि वर्ग-२च्या अनेक जागांवर सत्ताधा-यांचा हस्तक्षेप झाल्याचा आरोप करत वडेट्टीवार म्हणाले की, एमपीएससीला स्वच्छ करण्याची गरज आहे. आयोगाच्या अध्यक्षांची पार्श्वभूमी तपासली पाहिजे. एमपीएससीच्या परीक्षा पारदर्शक असतील तरच राज्यातील लाखो तरुणांचा आयोगावरील विश्वास कायम राहील. एमपीएससी अध्यक्षांच्या कार्यशैलीवरही प्रश्न



उपस्थित होत आहेत. संबंधित अध्यक्ष आरटीओ विभागातून सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांच्या प्रशासकीय पार्श्वभूमीचीही तपासणी झाली पाहिजे.

आरोग्य विभागातील वर्ग-१ पासून वर्ग-४ पर्यंतच्या अधिका-यांच्या नियुक्त्यांची जबाबदारी एमपीएससीकडे सोपवण्याची गरज काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. एमपीएससीमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळ सुरू आहे. हे सगळे पेपर ऑनलाईन घेण्यापेक्षा ऑफलाईन पद्धतीने घ्यावेत. वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या भरतीची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिली तरच यातील गडबड थांबू शकते, असे त्यांनी सांगितले.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरती प्रक्रियेतील कथित गैरप्रकारावरही वडेट्टीवार यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती न देणे, त्यानंतर न्यायालयीन प्रक्रिया सुरू होणे आणि पदोन्नतीच्या प्रक्रियेत निर्माण झालेला गोंधळ यामुळे अनेक पदे रिक्त राहिली आहेत. या संपूर्ण प्रकरणात ह्यएमपीएससीह्नमधील संबंधित अधिका-याला वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने जीआर रद्द केला असला तरी विद्यार्थ्यांच्या अनेक मागण्या अद्याप प्रलंबित आहेत. आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची जबाबदारी सत्ताधा-यांची आहे. आमच्या सरकारच्या काळात आम्ही आंदोलनाच्या ठिकाणी जाऊन विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेत होतो. आता प्रश्न विचारणारे लोकच सरकारला सहन होत नाहीत. प्रश्न सोडवण्याची हिंमत नाही आणि म्हणून आदिवासी विद्यार्थ्यांना वा-यावर सोडले आहे, अशी टीका त्यांनी केली. मागील वर्षी आदिवासी विभागाच्या तरतुदीपैकी केवळ सुमारे २९ टक्के निधी खर्च झाला.आदिवासींसाठी मंजूर केलेला निधी दुसरीकडे वळवण्याचा अधिकार सरकारला आहे का? असा सवाल केला.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनासंदर्भात मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या वक्तव्यावर वडेट्टीवार म्हणाले झिरवळ खाऊन-पिऊन आंदोलन करा, असे विद्यार्थ्यांना म्हणत असतील कारण ते देखील खाऊन-पिऊनच सर्व करतात, असा टोला लगावला.

आरटीओ विभागातील गैरप्रकाराबाबत वडेट्टीवार म्हणाले की, त्यांनी यापूर्वी उपस्थित केलेला मुद्दा अद्याप कायम आहे. संबंधित अधिका-याला पुन्हा महत्त्वाची जबाबदारी मिळत असल्यास त्यामागे वरिष्ठांचे संरक्षण आहे का, याची चौकशी झाली पाहिजे. खोटे ट्रॅप करून एसीबीच्या कारवाईचा गैरवापर झाला असल्याच्या तक्रारी आहेत. पुन्हा बैठका आणि कारभार सुरू झाल्याची माहिती आहे. आमचे त्यावर लक्ष आहे. गैरप्रकार पुन्हा सुरू झाला तर आम्ही तो सोडणार नाही.

# मॉडेलला घरात बसून संपवणाऱ्या जिम ट्रेनरचा एन्काऊंटर

**वृत्तसंस्था, दिल्ली**
दिल्लीस्थित मॉडेल मुस्कानच्या हत्येचा आरोपी, जिम ट्रेनर अकीब उर्फ इम्रानचा दिल्ली पोलिसांकडून एनकाऊंटर करण्यात आला. इम्रानने दिल्ली विद्यापीठाची विद्यार्थिनी असलेल्या मुस्कानच्या घरात प्रवेश करून तिची हत्या केली होती. दिल्ली पोलिसांच्या म्हणण्यानुसार, इम्रानच्या अटकेदरम्यान वेस्टर्न डिस्ट्रिक्ट स्पेशल स्टाफ टीमसोबत त्याची चकमक झाली. टीमला पाहताच इम्रानने गोळीबार केला. पोलिसांनी प्रत्युत्तर म्हणून केलेल्या गोळीबारात त्याच्या पायाला गोळी लागली. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

२६ वर्षीय इम्रान पूर्वी जिम ट्रेनर म्हणून काम करत होता. बुधवारी संध्याकाळी मुस्कान घरी एकटी होती. इम्रान घरी आला तेव्हा तिचे कुटुंबीय बाहेर गेले होते. त्या दोघांमध्ये कोणत्यातरी गोष्टीवरून वाद झाला. त्यानंतर आरोपीने मुस्कानवर अनेकवेळा



चाकूने वार करून फरार झाला. मुस्कानला गंभीर अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. बुधवारी संध्याकाळी पळून जाताना इम्रानने मुस्कानचा मोबाईल फोन सोबत नेला. तपासादरम्यान, पोलिसांनी रस्त्याच्या कडेला पडलेला फोन जप्त केला. त्याचे शेवटचे ठिकाण दिल्लीच्या नांगल परिसरात सापडले. या घटनेनंतर, संपूर्ण जिल्ह्यात बॅरिकेड्स आणि तपासणी नाके उभारण्यात आले आणि इम्रानचा शोध घेण्यासाठी पथके तैनात करण्यात आली. इम्रान आपली लपण्याची ठिकाणे सतत बदलत होता.

दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, गुरुवारी सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने इम्रान राजौरी गार्डनमध्ये सापडला. पोलिसांनी त्याला आत्मसमर्पण करण्यास सांगितले असता, त्याने पिस्तुलातून चार गोळ्या झाडल्या.

पोलिसांनी प्रत्युत्तर देत त्याला जखमी केले आणि ताब्यात घेतले. पोलिसांनी सांगितले की, आरोपीने चार गोळ्या झाडल्या, तर पोलिसांनी सात गोळ्या झाडल्या, ज्यात इम्रानच्या पायाला तीन गोळ्या लागल्या. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, सीसीटीव्ही फुटेजमध्ये इम्रान मुस्कानच्या इमारतीत शिरताना दिसला.

संपादकीय लेखणीतून...

# मेघमाला व्रत

मेघमाला व्रत किंवा माघमाला व्रत) हे जैन धमार्तील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण उपवास व्रत आहे. हे व्रत प्रामुख्याने आत्मशुद्धी, कर्म मुक्ती आणि इच्छित फलप्राप्तीसाठी केले जाते. जैन ग्रंथ आणि परंपरेनुसार या व्रताची माहिती, प्रारंभ आणि विधी- व्रतारंभ आणि कालावधी- जैन परंपरेत हे व्रत दोन वेगवेगळ्या पद्धतींनी किंवा तिथींनुसार केले जातेः ३१ दिवसांचे व्रत आहे, हे व्रत भाद्रपद कृष्ण प्रतिपदेपासून सुरू होऊन आश्विन कृष्ण प्रतिपदेपर्यंत सलग ३१ दिवस चालते. माघ महिन्यातील व्रत- काही प्रांतांत हे माघ शुद्ध पूर्णिमेला- माघमाला व्रत देखील केले जाते. पूजा विधी- अभिषेक आणि स्थापना- व्रताच्या पहिल्या दिवशी जिनालयात - जैन मंदिरात किंवा घराच्या अंगणात सुंदर सिंहासन किंवा कलश स्थापित केला जातो. त्यावर भगवान जिनेंद्रांची- तीर्थंकरांची प्रतिमा विराजमान करून महाअभिषेक केला जातो. श्वेत वस्त्रांचे महत्त्व- या पूजेमध्ये व्रत्याने- व्रत करणा?्या व्यक्तीने पांढरे-श्वेत वस्त्र परिधान करणे अत्यंत शुभ मानले जाते. मंदिरातील चंदोवाही पांढऱ्या रंगाचा असावा. १००८ कलश अभिषेक- मेघमालेच्या- ढगांच्या संततधारेप्रमाणे देवावर १००८ कलशांनी पावन पाण्याचा अभिषेक केला जातो, म्हणूनच याला "मेघमाला व्रत" म्हणतात. मंत्र जप- पूजा आणि अष्टद्रव्याने अर्घ्य अर्पण केल्यानंतर "ॐ ह्रीं पंचपरमेष्ठिभ्यो नमः" या मंत्राचा जप केला जातो. उपवास आणि नियम- व्रताच्या काळात कडक संयम आणि ब्रह्मचर्याचे पालन करावे लागते. प्रतिदिन जैन मंदिरामध्ये जाऊन देवदर्शन, सामायिक आणि जिनपूजा करणे अनिवार्य असते. अन्नाचा त्याग करून केवळ शुद्ध पाण्याचे सेवन किंवा एकासण- दिवसातून एकदाच सात्विक भोजन केले जाते. व्रताचे महत्त्व आणि फळ- हे व्रत केल्याने पूर्वजन्मीची पापकर्मे नष्ट होतात आणि आत्म्याला शांती लाभते. संसारिक संकटांमधून मुक्ती मिळून सुख-समृद्धी प्राप्त होते, असे मानले जाते.

व्रत पूजा विधीः मेघमाला व्रताच्या प्रारंभाच्या दिवशी खालीलप्रमाणे धार्मिक विधी केले जातात. अभ्यंगस्नान व वस्त्रेः व्रताची सुरुवात करणाऱ्या भाविकाने सकाळी शुद्ध पाण्याने स्नान करून पवित्र आणि स्वच्छ- शक्यतो पांढरी किंवा नवीन वस्त्रे परिधान करावीत. जिनालयात गमनः सर्व पूजा साहित्य घेऊन जैन मंदिरात-जिनालय जावे. मंदिराला तीन प्रदक्षिणा घालून जिनेंद्रा चरणी साष्टांग प्रणाम करावा. मंडप आणि कलश स्थापनाः मंदिराच्या प्रांगणात किंवा योग्य ठिकाणी सुंदर मंडप आणि नूतन वस्त्राचे चंद्रोवा- चन्दोवा बांधावा. जमिनीवर पंचरंगी अक्षतांनी अष्टदल कमळ काढावे. तिथे सिंहासन किंवा मंगल कलश स्थापित करून त्यावर थाळी ठेवावी आणि त्यात जिनबिंब- भगवंतांची मूर्ती विराजमान करावी. महाअभिषेकः मेघमालेच्या- पावसाच्या धारेप्रमाणे भगवंतांवर १००८ कलशांनी महाअभिषेक केला जातो. मंत्रजपः मुख्य पूजेनंतर भक्तांनी शांत चित्ताने-

"ॐ ह्रीं पंचपरमेष्ठिभ्यो नमः॥

ॐ ह्रीं पंचपरमेष्ठिभ्यो नमः॥॥" या मंत्राचा जप किंवा माळ ओढावी.३. व्रताचे नियमः या व्रताच्या कालावधीत साधकाने पूर्ण ब्रह्मचयार्चे पालन करावे लागते.खोटे बोलणे, राग, लोभ, आणि निंदा यांसारख्या मानवी दोषांपासून दूर राहून मन शांत ठेवावे लागते.जैन धर्माच्या मूळ तत्त्वांचे, विशेषतः अहिंसेचे काटेकोरपणे पालन करावे लागते.४. धार्मिक महत्त्वः हे व्रत केल्याने आत्म्यावरील कर्मांचे आवरण दूर होते आणि आंतरिक शुद्धी होते, अशी जैन ग्रंथांमध्ये मान्यता आहे.संकटांचे निवारण करण्यासाठी आणि कुटुंबात सुख-समृद्धी, शांती प्रस्थापित करण्यासाठी हे व्रत अत्यंत फलदायी मानले जाते.

मेघमाला व्रतारंभ पौराणिक कथासार : जैन ग्रंथांनुसार, जंबूद्वीपातील भरत क्षेत्रातील हस्तिनापूर नगरीत देवदत्त नावाचा एक अतिशय श्रीमंत पण अत्यंत कंजूस-कृपण शेठ राहत होता आणि त्याच्या पत्नीचे नाव देवदत्ता होते-१) लोभी स्वभावः देवदत्त आणि त्याची पत्नी इतके कंजूस होते की त्यांच्याकडे अपार संपत्ती असूनही ते कोणालाही दानधर्म करत नसत किंवा स्वतःवरही खर्च करत नसत. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांचा जीव नेहमी पैशातच अडकलेला असे. २) मुनींचे आगमन व उपदेशः एकदा हस्तिनापूर नगरीत एका जैनमुनींचे- आचार्यांचे आगमन झाले. त्यांच्या दर्शनासाठी संपूर्ण नगरी गोळा झाली. देवदत्त आणि देवदत्ता देखील मुनींचे प्रवचन ऐकण्यासाठी गेले. मुनींनी आपल्या उपदेशात मानवी जीवनाचे महत्त्व, दानधर्माचे फळ आणि आसक्ती- लोभ सोडून आत्मकल्याणाचा मार्ग सांगितला. ३) व्रताची प्राप्तीः मुनींच्या उपदेशाने प्रभावित होऊन शेठ आणि शेठाणीच्या मनातील लोभ दूर झाला. त्यांनी आपल्या पापांचे प्रायश्चित्त करण्यासाठी आणि आत्मशुद्धीसाठी मुनींकडे एका व्रताची मागणी केली. तेव्हा मुनींनी त्यांना "मेघमाला व्रत" धारण करण्याचा उपदेश केला आणि त्याची विधी सांगितली. ४) व्रताचे पालन व मोक्ष प्राप्तीः देवदत्त आणि देवदत्ता यांनी अत्यंत श्रद्धेने, कडक नियमांचे पालन करत हे ३१ दिवसांचे मेघमाला व्रत पूर्ण केले. या व्रताच्या आणि तपस्येच्या प्रभावाने त्यांचा संपूर्ण लोभ नष्ट झाला आणि त्यांचे विचार पवित्र झाले.

# हिमालयातील भू-पर्यावरणीय आपत्ती आणि सीमापार मानवी संकटः नेपाळमधील महाप्रलय

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भूगर्भीय रचनेच्या दृष्टीने हिमालयीन पर्वतरांग ही जगातील सर्वांत नाजूक, तरुण आणि अस्थिर रचना मानली जाते. भारतीय आणि युरेशियन टेक्टॉनिक प्लेट्सच्या सातत्यपूर्ण घर्षणामुळे हा संपूर्ण भूभाग भूकंपाच्या दृष्टीने अतिसंवेदनशील मानला जातो. तिबेट-नेपाळ सीमाभागात जाणवलेल्या भूकंपाच्या तीव्र धक्क्यांमुळे उंचावरील अत्यंत नाजूक पर्वतीय रचनेत मोठ्या प्रमाणावर भेगा पडल्या आणि परिणामी हिमनद्यांच्या सरोवरांचे नैसर्गिक बांध फुटले. या प्रक्रियेला भूगर्भशास्त्र आणि पर्यावरण विज्ञानात 'ग्लेशियर लेक आउटबर्स्ट फ्लड'म्हटले जाते. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलामुळे हिमनद्या आधीच वेगाने वितळत असताना भूकंपाच्या धक्क्याने हा नैसर्गिक जलसाठा प्रचंड वेगाने खाली आला. लाखो घनमीटर पाणी, मोठमोठे दगड, माती आणि गाळ घेऊन हा प्रवाह ल्हेन्डे खोला आणि भोटे कोशीच्या मार्गाने थेट त्रिशुली नदीच्या पात्रात उतरला. अवघ्या काही तासांत नदीपात्राची वहनक्षमता पूर्णपणे संपली आणि संपूर्ण खोऱ्यात अभूतपूर्व जलप्रलयाचे रूप धारण झाले.

या महाप्रलयाचा सर्वाधिक तडाखा नेपाळमधील रसुवा आणि लगतच्या नुवाकोट जिल्ह्याला बसला आहे. पाण्याच्या प्रचंड प्रवाहाने तिमुरे, स्याफ्रुबेसी आणि रसुवागढी यांसारख्या व्यापारी व सीमावर्ती भागांमधील पक्की घरे, बाजारपेठा, शाळा, सरकारी इमारती आणि वाहने क्षणात गिळंकृत केली. चीन-नेपाळ सीमा जोडणारा आंतरराष्ट्रीय व्यापारी महामार्ग अनेक ठिकाणी खचला असून, महत्त्वाचे संपर्क पूल आणि कॉंक्रीटचे रस्ते वाहून गेल्यामुळे या भागाचा उर्वरित देशाशी असलेला संपर्क पूर्णपणे तुटला आहे. सर्वात मोठा आर्थिक आणि पायाभूत आघात नेपाळच्या ऊर्जा क्षेत्रावर झाला आहे. त्रिशुली खोऱ्यात उभारण्यात आलेले रसुवागढी (१११ मेगावॉट), सानजेन खोला (७८ मेगावॉट), चिलिमे आणि अप्पर त्रिशुली ३ए यांसारखे सुमारे १३ जलविद्युत प्रकल्प पुराच्या पाण्याच्या आणि गाळाच्या तडाख्यात सापडले आहेत. धरणांचे नियंत्रण कक्ष आणि पॉवर हाऊसेस गाळात रुतल्याने नेपाळच्या राष्ट्रीय वीज ग्रीडमधून शेकडो मेगावॉट वीज अचानक गायब झाली आहे, ज्यामुळे संपूर्ण खोऱ्यात अंधाराचे साम्राज्य पसरले असून मदतकार्यासाठी आवश्यक वीज आणि दळणवळण ठप्प झाले आहे.

स्थानिक प्रशासनाच्या अंदाजानुसार १,००० हून अधिक स्थानिक नागरिक बेपत्ता असून मृतांचा आकडा सातत्याने वाढत आहे. या आपत्तीचे अत्यंत गंभीर आणि संवेदनशील आंतरराष्ट्रीय परिमाण म्हणजे या सीमावर्ती भागात अडकलेल्या भारतीय नागरिकांची संख्या होय. नेपाळमार्गे कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेले भाविक, सीमावर्ती भागात कार्यरत व्यापारी, ट्रॅव्हल ऑपरेटर्स आणि पर्यटक मिळून सुमारे १०० हून अधिक भारतीय नागरिक सध्या पूर्णपणे संपर्काबाहेर (नॉट रिचेबल) आहेत. याव्यतिरिक्त ३५ हून अधिक अनिवासी भारतीय नागरिकही या दुर्गम खोऱ्यात अडकल्याची पुष्टी झाली आहे. पुराच्या प्रचंड वेगामुळे डोंगरकडा कोसळून मोबाईल नेटवर्कचे टॉवर्स, वीजवाहिन्या आणि ऑप्टिकल फायबर केबल्स पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्यामुळे दळणवळण व्यवस्था शून्य झाली आहे. त्यामुळे भारतातील त्यांच्या कुटुंबियांशी कोणताही संपर्क होऊ शकलेला नाही, ज्यातून भारतात तीव्र चिंतेचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय तिमुरे सीमा नाक्यावर तैनात असलेले सशस्त्र पोलीस दलाचे जवान आणि सुरक्षा कर्मचारीही संपर्क तुटल्यामुळे दुर्गम भागात एकाकी पडले आहेत.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून काठमांडू येथील भारतीय दूतावासाने तातडीने उच्चस्तरीय आपत्कालीन नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. दूतावासाने भारतीय नागरिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी २४ तास कार्यरत राहणारे विशेष हेल्पलाइन क्रमांक (+९७७ ९८५१३१६८०७ / +९७७ ९७०९१०७५००) जाहीर केले आहेत. दूतावासाचे अधिकारी नेपाळचे गृह मंत्रालय, लष्कर आणि स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांशी सातत्याने समन्वय साधून बेपत्ता भारतीयांची यादी आणि त्यांच्या संभाव्य स्थानांचा शोध घेत आहेत. मात्र, प्रत्यक्ष मदतकार्यात निसगार्चे मोठे आव्हान उभे राहिले आहे. दुर्गम पर्वतीय भागातील सर्व तात्पुरती हेलिपॅड्स पुराच्या पाण्याखाली गेल्यामुळे आणि सततच्या हवामान बदलामुळे नेपाळ लष्कराच्या हेलिकॉप्टर्सना मदत पोहोचवण्यात आणि अडकलेल्या लोकांना एअरलिफ्ट करण्यात अडथळे येत आहेत. नेपाळ लष्कर, सशस्त्र पोलीस बल आणि स्थानिक स्वयंसेवक रबर बोटी, मेटल केबल्स आणि दोऱ्यांच्या साहाय्याने पायी मार्ग शोधून अडकलेल्या भाविकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे शर्थीचे प्रयत्न करत आहेत.

नेपाळमधील भौगोलिक रचनेनुसार तेथील सर्व पर्वतीय नद्यांचा प्रवाह थेट भारताच्या गंगा खोऱ्याकडे वाहतो. त्रिशुली आणि भोटे कोशी नद्या नारायणी नदीला मिळतात, जी भारतीय सीमेमध्ये पश्चिम चंपारणमार्गे प्रवेश करताना 'गंडक' म्हणून ओळखली जाते. नेपाळमध्ये झालेल्या या प्रचंड जलविसगार्मुळे उत्तर बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशातील सखल मैदानी भागात पुराचा थेट धोका निर्माण झाला आहे. बिहार प्रशासनाने तातडीने हाय अलर्ट जारी करत पश्चिम चंपारण, पूर्व चंपारण, गोपालगंज, सिवान आणि मुझफ्फरपूर या जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या ६ हून अधिक तुकड्या आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची पथके तैनात केली आहेत. गंडक आणि कोसी बॅरेजच्या सर्व दरवाजांवर २४ तास पाळत ठेवली जात असून, नदीकाठच्या सखल भागातील गावांना रिकामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नेपाळमधील हा महाप्रलय केवळ एका नैसर्गिक संकटापुरता मर्यादित नसून तो हिमालयीन प्रदेशातील अनियंत्रित मानवी हस्तक्षेप, नद्यांच्या नैसर्गिक पात्रात झालेले सिमेंटचे अतिक्रमण आणि अशाश्वत विकास मॉडेलवर गंभीर प्रश्न उपस्थित करतो. जागतिक तापमानवाढीमुळे वितळणाऱ्या हिमनद्या आणि भूकंपाच्या दृष्टीने नाजूक असलेले डोंगर अशा प्रकारच्या जलप्रलयांची वारंवारता भविष्यात वाढवणार आहेत. या पार्श्वभूमीवर भारत आणि नेपाळ या दोन्ही देशांना पारंपरिक मदतकार्याच्या पलीकडे जाऊन एकात्मिक सीमापार आपत्ती व्यवस्थापन प्रणाली विकसित करावी लागेल. हिमनदी सरोवरांचे रिअल-टाइम उपग्रह निरीक्षण, नदीपात्रात पाण्याची पातळी वाढताच दोन्ही देशांतील प्रशासनाला आणि नागरिकांना सावध करणारी स्वयंचलित 'अर्ली वॉर्निंग सिस्टीम', आणि संकटकाळात अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी एकत्रित शोध व बचाव कार्यप्रणालीची स्थापना करणे हिमालयाच्या पायथ्याशी वसलेल्या कोट्यवधी लोकांच्या जीवित व वित्त रक्षणासाठी अत्यावश्यक आहे.

- ९५६१५९४३०६

# रक्षाबंधनाला बहिण-भावांप्रमाणे, पृथ्वीला सुध्दा वृक्ष लागवडीच्या बंधनाची गरज!

रमेश लांजेवार
नागपूर

रक्षाबंधन हा पवित्र सण बहिण-भावाचा सण म्हणून राज्यासह देशात ओळखला जातो.राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखीपौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण मानला जातो.यामुळे बहिण-भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते.

उत्तर भारतात कजरी पौर्णिमा, पश्चिम भारतामध्ये "नारळी पौर्णिमा"या नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्त्राव थांबवला.तेव्हापासुन श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले. म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे.यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो.अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात.

चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती.राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी "जान जाये पर वचन न जाये"अशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या अतुट बंधन;म्हणजेच बहिण-भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव.कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो आणि नवीन उर्जा प्राप्त होते.यामुळे बहिण - भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.

सध्या बहिण-भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील,पृथ्वी शाबूत रहाली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील.कारण दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे व बदलत्या हवामानामुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन, भूकंप, सुनामी,ज्वालामुखीचा उद्रेक, अती थंडी,अती उष्णता, अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत सोबतच आता अलनिनोचा प्रभाव वाढत आहे याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे. बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी. परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे. कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे. यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. यामुळे मानवी हानी, शेतीचे नुकसान, वित्तीय हानी, समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी, भुकंप, वादळ, विजकोसळने,अती उष्णता,अती थंडी या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे.

त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात. परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक-एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल, भुकंपावर आळा बसेल, अलनिनोचा प्रभाव कमी होईल अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक, सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम, वाढदिवस अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल.

त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळेल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

- ९९२१६९०७७९

# कोलंबो कसोटीः दिनुशाचा ऐतिहासिक पराक्रम आणि भारतीय फिरकीचे 'नो-बॉल' ग्रहण

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

कोलंबोच्या ऐतिहासिक सिंहलीज स्पोर्ट्स क्लब मैदानावर सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघ विजयाच्या अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. भारताने आपल्या पहिल्या डावात उभारलेल्या ५०३/९ (घोषित) या डोंगराएवढ्या धावसंख्येसमोर श्रीलंकेचा संघ सुरुवातीपासूनच दबावात राहिला. चौथ्या दिवशी पावसाने व्यत्यय आणला असला, तरी दिवसअखेर श्रीलंकेने दुस?्या डावात ६ गडी गमावून २२९ धावा केल्या असून त्यांच्याकडे केवळ १६ धावांची नाममात्र आघाडी आहे. आता पाचव्या दिवशी श्रीलंकेचे उर्वरित ४ गडी झटपट बाद करून कसोटी आणि मालिका खिशात घालण्यासाठी भारतीय संघ मैदानात उतरेल.

### सोनल दिनुशाची अभूतपूर्व खेळी आणि 'स्वीप'वर हुकमत

सामन्यावर भारताचे वर्चस्व स्पष्ट दिसत असले, तरी श्रीलंकेच्या सोनल दिनुशाने आपल्या दर्जेदार तंत्राने सर्वांची दाद मिळवली आहे. अवघ्या ५ कसोटी सामन्यांच्या कारकिर्दीत ७५.८३ च्या सरासरीने ४५५ धावा कुटणाऱ्या दिनुशाने भारताविरुद्ध आपल्या पहिल्या तीनही डावांमध्ये ८० हून अधिक धावा (१००, ८४ आणि पहिल्या डावातील नाबाद ८५) करण्याचा पराक्रम केला. तमेच दुसऱ्या डावातही अर्धशतकी खेळी साकारली अशी कामगिरी करणारा तो झहीर अब्बास आणि एव्हर्टन वीक्स यांच्यानंतरचा जगातील केवळ तिसरा फलंदाज ठरला आहे.

दिनुशाच्या खेळीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे फिरकीविरुद्ध त्याचा 'स्वीप शॉट'. त्याने फिरकीविरुद्ध केलेल्या २८४ धावांपैकी तब्बल १२२ धावा (४२.९५%) या केवळ पारंपरिक, रिव्हर्स आणि स्लॉग स्वीपच्या माध्यमातून १६९.४४ च्या तुफानी स्ट्राइक रेटने केल्या आहेत. एका कसोटी मालिकेत स्वीप शॉटद्वारे सर्वाधिक धावा करण्याच्या विक्रमात त्याने युनिस खान (१०३ धावा) आणि मिस्बाह-उल-हक (१०३ धावा) यांना मागे टाकले असून, जो रूटच्या १०६ धावांच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. (या यादीत जो रूट १६० धावांसह अव्वल तर बेन डकेट ११२ धावांसह दुसऱ्या स्थानी आहे.)

### पंतचे क्रिकेटिंग चातुर्य आणि सुरियाबंदाराची ९२ धावांवर शिकार

चौथ्या दिवशी चहापानानंतर लंकन संघाला पसिंदू सुरियाबंदाराच्या रूपाने सर्वात मोठा धक्का बसला. ९२ धावांवर खेळत असताना पायचीतच्या निर्णयातून डीआरएसमुळे वाचलेला सुरियाबंदारा अस्वस्थ असल्याचे यष्टीरक्षक रिषभ पंतच्या चाणाक्ष नजरेने टिपले. स्टंप माइकमध्ये कैद झालेल्या संभाषणावरून पंतने लगेचच क्षेत्ररक्षणात बदल करत गोलंदाज मानव सुथारला ऑफ-स्टंपच्या बाहेर चेंडू टाकण्याची सूचना केली. पुढच्याच चेंडूवर पुढे सरसावणाऱ्या सुरियाबंदाराला पंतने क्षणाचाही विलंब न लावता चपळाईने यष्टीचीत केले आणि त्याचे शतक अवघ्या ८ धावांनी हुकले.

### फिरकीचे 'नो-बॉल' ग्रहण आणि लाजिरवाणा विक्रम

भारताचे विजयावर मजबूत नियंत्रण असले, तरी फिरकी गोलंदाजांच्या अतिरिक्त चेंडूंनी (नो-बॉल) पुन्हा एकदा डोकेदुखी वाढवली आहे. चालू कसोटीत भारतीय फिरकीपटूंनी तब्बल १० नो-बॉल टाकल्याने एका लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे.

२०२१ पासून कसोटीत फिरकीपटूंनी टाकलेल्या नो-बॉलची आकडेवारीः

अफगाणिस्तान वि. बांगलादेश (मीरपूर, २०२३): १५ नो-बॉल

भारत वि. इंग्लंड (चेन्नई, २०२१): १४ नो-बॉल

भारत वि. श्रीलंका (कोलंबो, २०२६): १०* नो-बॉल

?भारत वि. न्यूझीलंड (मुंबई, २०२४) व श्रीलंका वि. वेस्ट इंडिज (२०२१): प्रत्येकी ९ नो-बॉल

वैयक्तिक पातळीवरही रवींद्र जडेजा २०२१ पासून तब्बल ८८ नो-बॉलसह जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आहे (त्यानंतर नोमान अली ४०, लसिथ एम्बुलडेनिया ३३, जॅक लीच १९). सोनल श्रीलंकेसाठी सातत्याने उत्कृष्ट फलंदाजी करत असून, तिने एका बाबतीत युनिस खान, मिस्बाह-उल-हक आणि जो रूट यांना मागे टाकले आहे.

### कसोटी मालिकेत फिरकी गोलंदाजांविरुद्ध स्वीप शॉटमधून सर्वाधिक धावा (२००७ पासूनची आकडेवारी)

कसोटी क्रिकेटमध्ये फिरकीपटूंविरुद्ध 'स्वीप शॉट' हे फलंदाजांसाठी नेहमीच एक प्रभावी शस्त्र ठरले आहे. या शॉटचा कल्पक वापर करून एकाच कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणाऱ्या प्रमुख जागतिक फलंदाजांची कामगिरी खालीलप्रमाणे आहेः या यादीत इंग्लंडचा दिग्गज फलंदाज जो रूट अग्रस्थानी आहे. त्याने २०२१ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत स्वीप शॉटच्या जोरावर तब्बल १६० धावा कुटल्या होत्या. रूटचा हाच फॉर्म पुढे भारताविरुद्धच्या मालिकेतही दिसून आला, जिथे त्याने याच शॉटद्वारे १०६ धावा फटकावून तिसरा क्रमांक पटकावला. एवढेच नव्हे, तर २०१६ मध्ये भारताविरुद्ध झालेल्या मालिकेतही त्याने १०१ धावा याच पद्धतीने केल्या होत्या. इंग्लंडचा सलामीवीर बेन डकेट यानेही या शॉटवर हुकमत गाजवली आहे. २०२२ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेत त्याने स्वीप शॉटच्या मदतीने ११२ धावा करत दुसरा क्रमांक मिळवला, तर २०२४ मध्ये भारताविरुद्धच्या मालिकेत त्याने १०१ धावांची नोंद केली. श्रीलंकेच्या सोनल दिनुशा याने २०२६ मध्ये भारताविरुद्धच्या कसोटीत उत्कृष्ट तंत्र दाखवत नाबाद १०६ धावा केवळ स्वीप शॉटमधून वसूल केल्या.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# अमरावती जिल्ह्यातील सर्वच मोठ्या आस्थापनांचे फायर ऑडिट होणार !

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश, महिनाभरात फायर ऑडिट व फायर ड्रिल करण्याची प्रशासनाला पालकमंत्र्यांची तंबी, आरोग्य आयुक्तांचा अहवाल सात दिवसांत येणार, डफरिनप्रकरणी हयगय खपवून घेणार नाही!

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
अमरावती जिल्ह्यातील सर्व मोठ्या आस्थापनांचे अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण व आग प्रतिबंधक सराव एक महिन्याच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.



अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील (डफरीन) बालके मृत्यूच्या घटनेची अतिशय गंभीर दखल महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे घेतली, ही घटना २४ ऑगस्ट रोजी पहाटे ३.३० वाजता घडल्यानंतर सकाळी चारवाजेपासून संबंधित सर्व यंत्रणांशी संपर्क साधून आवश्यक निर्देश दिले.
या दुर्दैवी घटनेत ३ नवजात बालकांचा मृत्यू झाला. मृत बालकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी रु. ५ लक्ष मदत जाहीर करण्यात आली. पालकमंत्री बावनकुळे यांच्या सुचनेनुसार एकूण ३६ नवजात बालकांना सुरक्षिततेच्या दृष्टीने इतर रुग्णालयांमध्ये उपचारासाठी हलविण्यात आले. त्यापैकी २९ नवजात बालकांना पुढीलप्रमाणे विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती ११,डॉ.मुरके रुग्णालय, अमरावती ८, होप रुग्णालय, अमरावती ८,पारिजात रुग्णालय दोन अशा २९ नवजात बालकांवर विनामूल्य उपचार करण्याबाबत निर्देश दिले असुन त्यांचा मोफत उचार सुरु आहे. तसेच ७ नवजात बालके त्यांच्या मातांसोबत जिल्हा स्त्री रुग्णालयात वैद्यकीय देखरेखीखाली सुरक्षित आहेत.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोग्यमंत्री व आरोग्य सचिवाना तातडीने घटनास्थळी पाहणी करण्यासाठी पाठविले होते. त्यांनी दुपारी १.३० वाजता घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर आरोग्य आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यीय समिती गठित करण्यात आली असून, सात दिवसांच्या आत समितीने वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# संताजी फाउंडेशनतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

## शिष्यवृत्तीच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची साथ



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
आयुष्यात चढ-उतार येतच असतात. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी खचून न जाता प्रयत्न आणि संघषार्ची वाट धरली, तर यश निश्चितच आपल्या पदरात पडते, असा प्रेरणादायी संदेश मान्यवरांनी दिला. संताजी फाउंडेशन व संताजी यूथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तेली समाजातील गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांना जिद्द, सातत्य आणि मेहनतीची प्रेरणा दिली.
स्थानिक सत्यम सभागृहात आयोजित या भव्य सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका अलका रेवतकर होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन उमरेड विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय मेश्राम यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा प्राजक्ता कारू, प्रा. उपेंद्र बागुल, सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. विशाल खंते, माजी नगराध्यक्ष गंगाधर रेवतकर आणि खरेदी-विक्री सभापती सुरज इटनकर उपस्थित होते.
यावेळी उमरेड, भिवापूर व कुही तालुक्यातील तेली समाजातील शंभरहून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देतानाच आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, या सामाजिक जाणिवेतून संताजी फाउंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या संताजी फाउंडेशन शिष्यवृत्ती उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात आली.
याअंतर्गत खेमिका बालपांडे, सिमरन वंजारी आणि प्रणाली झाडे या गरजू विद्यार्थिनींना शिक्षणासाठी प्रत्येकी १० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. गुणवंतांचा सन्मान आणि गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक आधार अशा दुहेरी उपक्रमातून शिक्षणाला बळ देण्याचा फाउंडेशनचा प्रयत्न यावेळी अधोरेखित झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संताजी फाउंडेशनचे अध्यक्ष सतीश कामडी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मंगेश गिरडकर व अमित लाडेकर यांनी केले, तर अरविंद हजारे यांनी आभार मानले.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विलास मुंडले, जगदीश वैद्य, विशाल देशमुख, प्रशांत ढोके, जितेंद्र गिरडकर, केतन रेवतकर, प्रभाकर सोनटक्के, कोहिनूर वाघमारे, हरिचंद्र दहाघाने, उमेश हटवार, किशोर हजारे, राजेश बांद्रे, गिरीश लेंडे, राकेश नोकरकर, श्रीकांत ब्रम्हे, रोशन झाडे, नितेश कळंबे, संजय मानापुरे, दत्तू जिभकाटे, प्रफुल्ल बानकर, आशिष वंजारी, अमोल गिल्लुरकर, विशाल बारेकर, रोशन पाटील, रोशन झोडे, शशांक ब्रह्मे आदींनी परिश्रम घेतले.

# शा.औ. प्रशिक्षण संस्था सावनेर येथे रोजगार शिबिराचे आयोजन संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
कौशल्य रोजगार स्वयंरोजगार उद्योजकता विभाग अंतर्गत स्व.अण्णाजी कुबिटकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सावनेर येथे संस्थेचे प्राचार्य देवेन्द्र एच.कावडकर यांचे मार्गदर्शनाखाली भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्यात बहुसंख्येने माजी प्रशिक्षणार्थी यांनी हजेरी लावली मेळाव्या करिता डीफ्युजन इंजिनीरिंग प्रा. लि. कळमेश्वर, केमफिल्ड सेलुलोझ प्रा. लि. कळमेश्वर, सेवा ऑटोमोटिव्ह प्रा. लि. नागपूर, सेव्हेनस्का ट्रेनिंग इन्स्टिटयूट, निमजी, कळमेश्वर, एनआयआयटी छिंदवाडा या आस्थापनांची उपस्थिती होती त्यांनी सर्व उमेदवारांची निवड चाचणी व मुलाखत घेत मुलाखत स्थळीच उमेदवारांची निवड केली व त्यांना कंपनीमध्ये आमंत्रित करण्यात आले अशी माहिती संस्थेचे प्रशिक्षण व रोजगार अधिकारी रवींद्र लोही यांनी दिली रोजगार मेळाव्या करिता गटनिदेशक पि.के.मानेकर व इतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले .

# श्रावण महिन्यात महाकाल ग्रुप खमारीची कोटेश्वर धामकडे कावड यात्रा



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजू फुंडे**
श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त खमारी येथील महाकाल ग्रुपच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही मध्यप्रदेशातील कोटेश्वर धाम, लांजी, जि. बालाघाट येथे कावड यात्रा काढून भगवान महादेवाचे भक्तिभावाने दर्शन घेण्यात आले. महाकाल ग्रुपच्या सदस्यांकडून मागील तीन वर्षांपासून श्रावण महिन्यात कोटेश्वर धाम येथे कावड यात्रा आयोजित केली जात आहे. या यात्रेत सहभागी होणारे भाविक मोठ्या श्रद्धेने कावड घेऊन महादेवाच्या नामस्मरणात मार्गक्रमण करतात. हर हर महादेव, बम बम भोलेच्या जयघोषाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले.
या कावड यात्रेत नितेश जगणे, सोनू गिरी, कुणाल जिजा, कृष्णा बिल्लुरे, गणेश तरोणे, नातू शिहमारे, दुर्गेश इंदूरकर, खिलेंद्र सहारे, मोतीलाल मानकर यांच्यासह महाकाल ग्रुपचे सदस्य सहभागी झाले. यात्रेच्या आयोजनात लेडीज महाकाल समिती, खमारी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. महिलांनीही उत्साहाने सहभाग घेत भक्तिमय वातावरण निर्माण केले. श्रावण महिन्यात भगवान महादेवाच्या दर्शनासाठी दरवर्षी कावड यात्रा काढण्याची ही परंपरा महाकाल ग्रुपच्या सदस्यांनी श्रद्धा, एकता आणि धार्मिक भावनेने जपली आहे. या यात्रेमुळे खमारी परिसरातील शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# लाडक्या बहिणींसाठी मनपाची आज मोफत बस सेवा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
भाऊ-बहिणींच्या अतूट नात्याचा सण असलेल्या रक्षाबंधनाच्या दिवशी नागपूर महानगरपालिकेने शहरातील महिलांसाठी मोफत बस प्रवास सवलतीचा विशेष उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी म्हणजे, शुक्रवार २८ ऑगस्टला मनपाच्या आपली बस मध्ये महिला व तिचे १० वर्षाखालील अपत्ये आपली बस सेवेचा मोफत लाभ घेऊ शकणार आहेत.
महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून तसेच उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेद्र (बाल्या) बोरकर, परिवहन समितीच्या सभापती मंगला खेकरे व आयुक्त डॉ. विपीन मार्गदर्शनात हा उपक्रम राबविला जाणार आहे.
मनपातर्फे संचालित आपली बसमध्ये ही सवलत लागू राहणार आहेत. २८ ऑगस्टला आपली बसच्या पहिल्या फेरीपासून तर रात्रीच्या अखेरच्या फेरीपर्यंत महिला या बसमधून मोफत प्रवास करू शकणार आहे. त्यांना कोणतेही तिकीट काढावे लागणार नाही. महिलांसोबत त्यांचे १० वषार्खालील अपत्यांना सुद्धा कोणतेही तिकीट आकारले जाणार नाही. या सोयीचा शहरातील महिलांनी जास्तीतजास्त लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती मंगला शशांक खेकरे, उपसभापती सुधीर उर्फ (बंडू) हरिदास राऊत, सदस्य विजय होले,



अर्चना पडोळे, प्रमिला मथरानी, मंगला मस्के, रुपाली ठाकुर, पुजा पाठक, शैलेश पांडे, किशोर कुमेरिया, दिनेश यादव, अ. करीम अ. गफ्फार पटेल(शकील पटेल) यांनी केले आहे.

**महिलांच्या सोयीसाठी तत्पर- महापौर**

रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या भाऊरायाची भेट घेण्यासाठी महिलांना या दिवशी कोणतेही तिकीट काढावे लागू नये, यासाठी मनपाने विशेष उपक्रम

**रक्षाबंधनानिमित्त मनपाचा विशेष उपक्रम**

राबविण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील महिलांनी या सुविधेचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा. महिलांना अधिकाधिक सोयीसुविधा पुरविण्यासाठी मनपा कटिबद्ध असल्याचे महापौर निता ठाकरे यांनी म्हटले आहे.

**१० वर्षाखालील अपत्यांनाही लाभ - मंगला खेकरे**

रक्षाबंधनाच्या दिवशी महिलांसोबत प्रवास करणाऱ्या १० वर्षाखालील अपत्यांना सुद्धा या सवलतीचा लाभ मिळणार असल्याचे परिवहन समितीच्या सभापती मंगला खेकरे यांनी सांगितले. मनपाच्या एसी व नॉन एसी अशा दोन्ही प्रकारच्या बसमध्ये ही सुविधा उपलब्ध असल्याचेही मंगला खेकरे यांनी स्पष्ट केले.

# राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भुमिपूजन संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत रामटेक तालुक्यातील दाहोदा,सालई, बांद्रा, करवाही, लोधा - पिंडकापार, गोंडीटोला, बेलदा, वडंबा, बोथिया पालोरा, सीतापूर, मौदी, खरपडा गावातील सभामंडप व आकर्षक पथदिवे भूमिपूजन दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते संपन्न झाले.
यावेळी शिवसेना तालुका प्रमुख विवेक तुरक, माजी जि. प. सदस्य संजय झाडे, माजी पं. स. सभापती चंद्रकांत कोडवते, संजय नेवारे, विनोद मरस्कोल्हे, आकाश पंधरे, ग्रामपंचायत कट्टा सरपंच वनिता टेकाम,उप सरपंच विशाल वरठी, ग्रा. पं. बांद्रा सरपंच कल्पना भलावी, ग्रा. पं. पिपरीया सरपंच प्रवीण उईके, ग्रा. पं. डोंगरताल सरपंच उपेश उईके, ग्रा. पं. पिंडकापार सरपंच विलास उईके, ग्रा. पं. वडंबा सरपंच मुकेश दुबे, ग्रा. पं. पथरई सरपंच संदीप



वासनिक, ग्रा. पं. दाहोदा सरपंच आकाश वासनिक, ग्रा. पं. वरघाट सरपंच देवराज इनवाते,ग्रा. पं.सालई सरपंच उत्तम दराडे, ग्रा. पं. टांगला सरपंच पंचफुला मडावी, ग्रा. पं. उमरी सरपंच रविंद्र कुमरे, ग्रा. पं. पुसदा पु. १ सरपंच मंगला मेश्राम,, ग्रा. पं. पुसदा पु. २ सरपंच मेघा कोडवते सह गावकरी मंडळी प्रामुख्याने उपस्थित होते.

थोडक्यात

# टीबीमुक्त ग्रामपंचायत अभियानांतर्गत नक्षी येथे ६७ जणांची एक्स-रे तपासणी



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
सोमनाळा प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत नक्षी येथील उपकेंद्राला गुरुवारी (दि. २७) डॉ. केवलजी कोरडे यांनी भेट देऊन असंसर्गजन्य आजारांबाबत (एनसीडी) सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी टीबीमुक्त ग्रामपंचायत अभियानांतर्गत एक्स-रे शिबिर आयोजित करण्यात आले.शिबिरात नक्षी येथील ६७ नागरिकांचे एक्स-रे करण्यात आले. या वेळी नक्षीचे सरपंच अनिकेत वराडे, ग्रा. पं. सदस्य व गावकरी उपस्थित होते. टीबी रुग्णांचा वेळेत शोध घेऊन आवश्यक उपचार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे शिबिर घेण्यात आले.

# वृक्षराखीने साजरी झाली बंधुभावाची नवी व्याख्या! जिल्हा परिषद सेमी इंग्रजी शाळा भोवरीचा स्तुत्य उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
बंधूप्रेमाचा सण मानला जाणारा 'रक्षाबंधन' हा सण जिल्हा परिषद प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा भोवरी येथे एका अनोख्या आणि पर्यावरणपूरक मार्गाने साजरा करण्यात आला. यावर्षी शाळेतील विद्यार्थ्यांनी माणसांऐवजी परिसरातील वृक्षांना राखी बांधून, त्यांच्या रक्षणाची पर्यावरणपूरक शपथ घेतली.
"वर्षानुवर्षे कोणतेही मोल न मागता झाडे आपल्याला सावली, फळे, फुले आणि सर्वात महत्त्वाचा म्हणजे प्राणवायू (ऑक्सिजन) देतात. खऱ्या अर्थाने निसर्गच आपला सर्वात मोठा रक्षक आहे," या भावनेतून शाळेच्या मुख्याध्यापिका पठाण तबसून यांनी या संकल्पनेचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या नैसर्गिक व सुती धाग्यांच्या राख्या शाळेच्या प्रांगणातील तसेच गावातील झाडांना प्रेमाने बांधल्या. "जसे हे वृक्ष वर्षानुवर्षे आमचे रक्षण करत आले आहेत, तसेच आम्ही आयुष्यभर या वृक्षांचे जतन, संवर्धन आणि रक्षण करू," अशी सामूहिक शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. शाळेतील विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे भोवरी गावातील ग्रामस्थ, पालक आणि शिक्षण क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. मानवी नात्यांसोबतच निसर्गाशी घट्ट नाते जोडणारा हा उपक्रम समाजाला पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी एक नवा संदेश देऊन गेला आहे.

# 'एक राखी सैनिकांसाठी' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी साकारल्या आकर्षक राख्या



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
'एक राखी सैनिकांसाठी' या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्यांचे सुंदर प्रदर्शन आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने वापर करून आकर्षक व कलात्मक राख्या तयार केल्या. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी राखी बनविण्याची कृतीही प्रदर्शनात सादर केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच 'टाकाऊपासून टिकाऊ' या संकल्पनेचा प्रभावी संदेश देण्यात आला. तसेच देशाच्या सीमेवर कार्यरत असलेल्या सैनिकांप्रती प्रेम, आदर व कृतज्ञतेची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली.
या उपक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका कु. अनुराधा धुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सहशिक्षक निलेश जाधव यांचीही उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या या कलाकृतींचे कौतुक करण्यासाठी गावच्या सरपंच दर्शना बागडे, ग्रामसेवक वैभव बावनकर, उपसरपंच रामपाल धांडे तसेच विकी आस्वले, केशवराव गायधने, सुषमा बानते, सिंधू नकोरिया, सूर्यधारा रामटेके, शुभम बांते आदी मान्यवर व पालक उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व उपक्रमातील सहभागाचे कौतुक केले.

# स्वरयात्रा सांगीतिक कार्यक्रमाने होणार, सोमलवार सभागृहाचे उद्या उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
गेल्या ११५ वर्षांपासून नागपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या सोमलवार शिक्षण संस्थेच्या वतीने खामला परिसरातील अण्णासाहेब सोमलवार सभागृहाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा या सभागृहाचे उद्घाटन सोहळा शनिवार, २९ ऑगस्ट रोजी स्वरयात्रा या विशेष सांगीतिक कार्यक्रमाने होणार आहे. अण्णासाहेब सोमलवार सभागृह, सोमलवार शाळा परिसर, राणाप्रताप नगर रोड, खामला येथे सायंकाळी ६.३० वाजता हा कार्यक्रम होईल. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या अजरामर गीतांवर आधारित स्वरयात्रा या कार्यक्रमात योगेंद्र रानडे, सारंग जोशी, निकेता जोशी आणि अनुजा मेंघाल-सावजी हे गायक कलाकार सदाबहार गीतांना सुरेल स्वरांतून उजाळा देतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली देशपांडे करणार आहेत. कार्यक्रमास प्रवेश केवळ निमंत्रणाद्वारे राहणार आहे.

थोडक्यात

## सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

आगामी गोकुळ अष्टमी, पोळा, तान्हा पोळा व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भिवापूर पोलीस ठाण्यात गुरुवारी शांतता समितीची बैठक ठाणेदार रवींद्र मस्कर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सणोत्सव शांततेत व सलोख्याने साजरे करण्याचे आवाहन करण्यात आले. गणेश मंडळांनी आवश्यक परवानग्या वेळेत घ्याव्यात, डीजेचा वापर रात्री १० वाजेपर्यंतच करावा व धार्मिक भावना दुखावतील असे कृत्य टाळावे, अशा सूचना देण्यात आल्या.

शहर व ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर संशयास्पद व्यक्ती अथवा टोळी आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले. व्यापारी व सराफ व्यावसायिकांनी सीसीटीव्ही सुस्थितीत ठेवून ३० दिवसांचा बॅकअप ठेवावा, असेही सांगण्यात आले. सोशल मीडियावर अफवा पसरवू नये व वाद झाल्यास ११२ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन ठाणेदार मस्कर यांच्याकडून करण्यात आले. बैठकीला शांतता समिती सदस्य नगरध्यक्षा सुषमा श्रीरामे नगरअध्यक्ष, दिलीप गुप्ता, लहु जनबंधु, पत्रकार शरद मिरे, नाझीम बेग, आनंद गुप्ता, जावेद कुरेशी, प्रमोद रघुशे, हिमांशु आग्रवाल, अमिन कच्छी, श्रीकांत बालपांडे, पवन राउत, विवेक ठाकरे, अनिल समर्थ उपस्थित होते.

## पोक्सो कायद्यावर महाविद्यालयात जनजागृती




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

भिवापूर महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार समिती व तालुका विधी सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने 'पोक्सो ॲक्ट-२०१२' या विषयावर गुरुवारी उद्बोधन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीच्या अध्यक्षा मा. वाय. व्ही. कडू होत्या. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज व ॲडव्होकेट हुडकन प्रमुख उपस्थित होते. ॲडव्होकेट हुडकन यांनी पोक्सो कायद्यातील तरतुदींवर मार्गदर्शन केले. बालकांच्या लैंगिक शोषणाविरोधात समाज, पालक व शैक्षणिक संस्थांनी एकजुटीने उभे राहणे आवश्यक असल्याचे मा. कडू यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अनिता महावादीवार यांनी केले, तर संचालन व आभार नरहरी पेंदाम यांनी मानले. यावेळी विद्यार्थी, न्यायालयीन कर्मचारी व महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पर्यावरण रक्षणाचा अनोखा संदेश; विद्यार्थ्यांनी वृक्षांना बांधल्या राख्या

**दै. सिंहवाणी वृत्त, कांद्री माईन्स, रामटेक**

प्रकाश हायस्कूल, कांद्री माईन्स, रामटेक येथे रक्षाबंधनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी राखी बनविण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः विविध रंगांच्या व आकर्षक




राख्या तयार केल्या. रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांनी वृक्षांना राख्या बांधून पर्यावरण रक्षणाचा एक अनोखा आणि स्तुत्य संदेश दिला आहे. 'निसर्ग टिकला तरच मानव टिकेल' हा विचार मनात ठेवून विद्यार्थ्यांनी पारंपारिक सणाला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीची जोड दिली आहे. विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरातील वृक्ष व रोपांना राखी बांधून त्यांचे संरक्षण करण्याचा संकल्प केला. वृक्ष आपले जीवनदाते आहेत, त्यांचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे, असा पर्यावरणसंवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.

या उपक्रमातून रक्षाबंधनाचा सण केवळ भाऊ-बहिणीपुरता मर्यादित न ठेवता निसर्ग आणि वृक्षांप्रती असलेले प्रेम व कर्तव्य जपण्याचा सुंदर संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि पर्यावरणाविषयीची जागरूकता यामुळे कार्यक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले.यावेळी विद्यार्थी यांना बक्षीस वितरण करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे, कार्यकमाचे संयोजक कामिनी पाटील, सुचिता नागपुरे होते.

## एकात्मता विद्यालयात रक्षाबंधनाचा उत्साह

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालय, एकात्मता नगर, जयताळा, नागपूर येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न



झाला. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी शाळेत विविध प्रकारच्या आकर्षक व रंगीबेरंगी राख्या स्वतः तयार केल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा व कलागुणांचा सुंदर आविष्कार घडवत विविध कलात्मक राख्या बनविल्या. त्यानंतर विद्यार्थ्यांनी एकमेकांना प्रेम, आपुलकी व बंधुभावाचे प्रतीक असलेल्या राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण आनंदाने साजरा केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, बंधुभाव, सहकार्य, स्नेह आणि सामाजिक एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश देण्यात आला.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे हिवाळी अधिवेशनदरम्यान दिल्लीत ओबीसी कॉलमसाठी ठिय्या आंदोलन करणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रीय ओबीसी महासंघ तसेच महिला महासंघ, कर्मचारी-अधिकारी महासंघ, युवा महासंघ, किसान महासंघ, राष्ट्रिय ओबीसी मेडिकल सर्व्हिसेस महासंघ,वकील महासंघ आणि विद्यार्थी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. २६ आणि ऑगस्ट २०२६ नागपूर येथे धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर येथे महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय नियोजन बैठकीचे आयोजन राष्ट्रिय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ बबनराव तायवाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती.






या बैठकीत दिनाक १४ ऑगस्ट २०२६ रोजी दुसऱ्या टप्प्यातील जनगणनेच्या प्रश्नावली मध्ये १० व्या प्रश्नात अनुसूचित जाती, जमाती आणि जात संबंधित प्रश्न विचारला आहे परंतु ओबीसींचा कॉलम नसल्याने, लोकसभेच्या हिवाळी अधिवेशन दरम्यान ठिय्या आंदोलन करण्यात येणार असून त्यात २०२७ च्या जनगणनेच्या ओबीसींचा स्वतंत्र कॉलम असावा, केंद्रात ओबीसी साठी स्वतंत्र मंत्रालय असावे, क्रिमिलेअरची मयार्दा वाढविण्यात यावी आणि महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, या मागण्या घेऊन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी डॉ.बबनरावजी तायवाडे साहेब यांनी आपले मत व्यक्त करताना म्हणाले

**लढा अनेक वर्षांचा, संघर्ष अखंड सुरूच राहणार!**

डॉ. बबनरावजी तायवाडे यांनी सांगितले आहे की राष्ट्रीय ओबीसी महासंघाची भूमिका अत्यंत स्पष्ट आणि प्रेरणादायी आहे. ओबीसींच्या हक्कासाठीचा हा लढा आजचा नाही; हा अनेक वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष आहे आणि ओबीसींना न्याय व त्यांचे हक्क मिळेपर्यंत हा लढा कायम लढविला जाईल.

परिस्थिती कोणतीही असो, आव्हाने कितीही मोठी असोत; ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांशी तडजोड केली जाणार नाही. संघटन, संघर्ष आणि सातत्याच्या बळावर हा लढा अधिक ताकदीने पुढे नेला जाईल.

**लढा थांबणार नाही, संघर्ष कमी होणार नाही**

ओबीसींच्या हक्कासाठी आवाज कायम बुलंद राहणार. आजचा संघर्ष उद्याच्या पिढीच्या अधिकारासाठी आहे!

महासचिव सचिनजी राजुरकर यांनी आपली प्रतिक्रिया देताना म्हणाले की ही लढाई आता आर पार ची लढाई आहे!

बैठकीत व्यक्त केलेला हक्कासाठी ही आर पार ची लढाई लढायची हा निर्धार निश्चितच प्रत्येक ओबीसी कार्यकर्त्यांच्या मनात नवी ऊर्जा निर्माण करणारा आहे.आता मागे हटायचे नाही, थांबायचे नाही आणि झुकायचेही नाही.

यावेळी राज्यभरातून राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या महिला अध्यक्ष रत्नमाला पिसे, कार्याध्यक्ष प्रा .शेषराव येलेकर, उपमहापौर शेखर सावरबांधे, डॉ अशोक जीवतोडे सुभाष घाटे, गुणेश्वर आरिकर, प्रा.शरद वानखेडे, प्रा .राजु गोसाई, प्रकाश साबळे, दिनेश चोखारे, डॉ. विनोद चौधरी, आरती झोटिंग उपस्थित होते प्रास्ताविक सुरज बेलोकर तर आभार ऋतिका डाफ यांनी केले बैठकीत ओबीसी संघटनेचे प्रतिनिधी जात संघटनेचे बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# ECCED शिक्षक प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांचा दीक्षांत समारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

भांडुप येथील गीता हॉलमध्ये २३ ऑगस्ट २०२६ रोजी ECCED शिक्षक प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांच्या दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी खासदार पल्लवी संजय पाटील, कॅप्टन सुलक्षण शर्मा, कॅप्टन मुकेश गुप्ता तसेच सेव्हन हिल्स इंटरनॅशनल स्कूल, मुलुंडच्या मानसी मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.




कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. एका विद्यार्थ्याने पियानोवर सरस्वती वंदना सादर केली. तसेच भरतनाट्यमच्या माध्यमातून गणेश वंदना आणि भगवान शिवाची आराधना सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या कलात्मक सादरीकरणाने उपस्थित मान्यवर, पालक आणि अतिथी भारावून गेले.

या रंगतदार शैक्षणिक सत्राच्या समारोप कार्यक्रमाला १०० हून अधिक मान्यवर व पालक उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या भावी शिक्षकांना प्रमुख अतिथींच्या हस्ते पदवी व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्री. अमन बर्थवाल यांनी केले. ECCED व्होकेशनल कोर्सच्या संचालिका डॉ. आनंदी सिंह रावत यांनी उपस्थित सर्व मान्यवर, पालक, विद्यार्थी आणि सहकाऱ्यांचे आभार मानले. तसेच विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांनी भविष्यात एक संवेदनशील, जबाबदार आणि आदर्श शिक्षक म्हणून कार्य करावे, अशा शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ECCED टीममधील नरेंद्र सेठी, लक्ष्मण सर, पूजा गुप्ता, डॉ. पूजा सिंह आणि मनोज सर यांनी मोलाचे सहकार्य केले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून विद्यार्थ्यांचा हा दीक्षांत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे संपन्न झाला.

# दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या राख्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद

## एकविरा मतिमंद मुलांचे बालगृहांमध्ये कौतुकास्पद उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

तालुक्यातील काचुरवाही येथील एकविरा मतिमंद मुलांचे बालगृह येथील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कला कौशल्यास वाढ होऊन व्यवसायिक शिक्षण मिळावे यासाठी बालगृहाचे मुख्याध्यापक विलास रूपचंद फटिंग यांच्या मार्गदर्शनात बालगृहातील विशेष शिक्षक व कला शिक्षकांनी दिव्यांग विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या प्रकारच्या सुंदर राख्या तयार करून घेतल्या.



शहरातील वेगवेगळ्या शाळा व महाविद्यालय परिसरात प्रदर्शनी व विक्री करिता विद्यार्थ्यांना स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले. याप्रसंगी बालगृहातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या या त्यांच्यातील कलाविष्काराचे उत्तम उदाहरण असल्याचे प्राचार्य अविनाश श्रीखंडे सर व न्यायाधीश थोडगे सर, मुरकुटे सर, शिरवाडकर मॅडम यांनी राखी निमित्त प्रदर्शनीला भेटी प्रसंगी मत व्यक्त केले.

बालगृहातील विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्यांची प्रदर्शनी व विक्री दिवाणी न्यायालय रामटेक, कवी कुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स (किट्स ) रामटेक, ज्ञानदीप कॉन्व्हेंट शीतलवाडी, साई इंटरनॅशनल स्कूल शितलवाडी, प्रॉव्हिडन्स इंग्लिश स्कूल मनसर, संस्कृत विश्वविद्यालय रामटेक, जनप्रभा कॉन्व्हेंट रामटेक, स्व. नंदकिशोर जयस्वाल माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय काचुरवाही व सुरज मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा काचुरवाही येथे लावण्यात आली.

प्रदर्शनीच्या उद्घाटनाकरिता काचुरवाही येथील सरपंच सौ. सविता नागोसे, सुनील कोल्हे, संस्थेचे संस्थापक गणेशजी गोल्हर, उपाध्यक्ष . प्रकाशजी कुंभलकर, सचिव जितेंद्र गोल्हर, मुख्याध्यापक विलास फटिंग, शाळा प्रमुख तुळशीराम जुनघरे उपस्थित होते.

बालगृहाचे मुख्याध्यापक विलास फटिंग यांच्या विशेष मार्गदर्शनात बालगृहातील शिक्षक मुलाद्वारे वर्षभर वेगवेगळे व्यावसायिक उपक्रम राबवीत असतात. जसे बैल पोड्या निमित्त बैलाच्या आकर्षक मूर्ती तयार करणे, दिवाळीनिमित्त सुंदर व आकर्षक पणत्या तयार करणे, आकाश कंदील तयार करणे, परसबाग लागवड करणे व त्यांचे प्रदर्शनी व विक्री करणे इत्यादी प्रकारचे उपक्रम राबविले जातात.

या कार्यात बालगृहातील विशेष शिक्षक, कला शिक्षक, मानसशास्त्रज्ञ व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंदोलन व आजची परिस्थितीवर नागपुरात विशेष चर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ऑल इंडिया आंबेडकर महासभा (पंजी) तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंदोलन व आजची परिस्थिती या विषयावर विशेष चर्चा व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी २८ ऑगस्ट रोजी, सकाळी ११ वाजता तथागत बुद्ध विहार, हिवरी नगर, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या सामाजिक समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि संविधानिक मूल्यांच्या विचारांचा आजच्या सामाजिक परिस्थितीशी संबंध जोडून या कार्यक्रमात सखोल चर्चा करण्यात येईल. आंबेडकरी चळवळी समोरील सद्या आव्हाने, चळवळीची सद्यस्थिती तसेच भविष्यातील दिशा यावर मान्यवर मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तथागत धम्म प्रचार संघाचे अध्यक्ष दिलीप रामटेके राहतील.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ऑल इंडिया आंबेडकर महासभेचे अध्यक्ष राकेश बहादूर, महासचिव सरदार अमरिक सिंह बांगर, कोषाध्यक्ष सौ. रीना गावस्कर वाल्मिकी तसेच पंचायत समिती तुमसरचे माजी सभापती कलाम शेख उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रीवा, मध्य प्रदेशचे आदिवासी नेते छोटू कौल, हैदराबाद, तेलंगणाचे अँडव्होकेट नानूर गोपाल तसेच ऑल इंडिया आंबेडकर महासभा, पंजाबचे प्रदेशाध्यक्ष निर्मलजीत यांची उपस्थिती राहतील. आंबेडकरी विचारसरणीचा सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेवर झालेला प्रभाव, संविधानिक मूल्यांचे संरक्षण आणि वर्तमान सामाजिक परिस्थितीत आंबेडकरी चळवळीची भूमिका या विविध विषयांवर कार्यक्रमात विचारमंथन होणार आहे.

# उमरेडमध्ये शैक्षणिक मार्गदर्शन कार्यशाळा, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधींची दिशा

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

दहावी-बारावीनंतर नेमके काय करावे. उच्च शिक्षणासाठी कोणते अभ्यासक्रम व विद्यापीठे निवडावीत. प्रवेश परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी. आर्थिक अडचणी असतानाही नामांकित विद्यापीठात शिक्षण घेता येते का? अशा विद्यार्थ्यांच्या मनातील विविध प्रश्नांना समर्पक उत्तरे देत विचार मंथन, उमरेड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, उमरेड यांच्या संयुक्त विद्यमाने आर. एन. लॉन, उमरेड येथे शैक्षणिक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या व्यापक संधींची माहिती मिळावी आणि त्यांच्या आवड, क्षमता व गुणवत्तेनुसार योग्य शैक्षणिक व करिअरची दिशा निश्चित करता यावी, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमधील अभ्यासक्रम व प्रवेश प्रक्रिया, केंद्रीय विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे तसेच नामांकित विद्यापीठांमधील उच्च शिक्षणाच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच दहावी व बारावीनंतर उपलब्ध असलेले विविध शैक्षणिक पर्याय, शिष्यवृत्ती योजना, प्रवेश परीक्षा, स्पर्धा परीक्षा आणि शासकीय सेवांमधील संधी यांची माहिती देण्यात आली.




नेचर फाउंडेशन, नागपूरचे निलेश नन्नावरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दहावी-बारावीनंतर योग्य अभ्यासक्रमाची निवड, विविध प्रवेश परीक्षा, स्पर्धा परीक्षांची तयारी, शासकीय नोकरीच्या संधी तसेच पदवी शिक्षणासोबत सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याच्या उपलब्ध संधी यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ पारंपरिक अभ्यासक्रमांचा विचार न करता आपल्या आवडी आणि कौशल्यांनुसार करिअरची दिशा ठरवावी, असा संदेश त्यांनी दिला.

मयूर हाडके यांनी अझीम प्रेमजी युनिव्हर्सिटी, बेंगळुरू येथील शिक्षणाच्या संधी व प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असूनही माहितीच्या अभावामुळे अनेक संधी हातातून निसटतात. मात्र योग्य तयारी, मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही देशातील नामांकित विद्यापीठांच्या प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकतात, असा आत्मविश्वास त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केला.

यासोबतच पुणे, मुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांसह विविध शैक्षणिक केंद्रांमधील संधी, एकलव्य मराठी शाळांमधील प्रवेश, सीबीएसई शिक्षणाच्या संधी आणि नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील प्रवेश प्रक्रिया याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विजयानंद सावळे होते. अतिथी म्हणून मयूर हाडके उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या शैक्षणिक व करिअरविषयक प्रश्नांवर मार्गदर्शकांनी थेट संवाद साधत शंकांचे निरसन केले. त्यामुळे कार्यशाळेला विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षणप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जितेंद्र नगरारे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रशांत राऊत यांनी केले, तर आभार विठू इरपाते यांनी मानले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी संजय बन्सल, वीरेंद्र मेश्राम, हरीश श्यामकुवर, इंद्रपाल गजघाटे, शरद आटे आणि खुशेंद्र मेश्राम यांनी परिश्रम घेतले. माहिती, मार्गदर्शन आणि योग्य दिशा मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही उच्च शिक्षणाच्या शिखरावर पोहोचू शकतात, हा आत्मविश्वास या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाला.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

# नारळी पौर्णिमा : कोळी गाणी-नृत्य आणि सजवलेल्या बोटी- उत्सवाचे आकर्षण

श्रावण महिन्यातील पौर्णिमेला नारळी पौर्णिमा हा सण प्रामुख्याने महाराष्ट्रात, विशेषतः कोकण किनारपट्टीवर व कोळी बांधवांकडून अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी कोळी बांधव व समुद्रकिनारी राहणारे लोक जलदेवता-वरुणदेव आणि समुद्रराजाची पूजा करतात. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असतो. हा काळ मासेमारीसाठी बंद असतो. नारळी पौर्णिमेनंतर पावसाचा जोर कमी होतो व समुद्र शांत होऊ लागतो. त्यामुळे मच्छीमार पुन्हा सुरक्षितपणे आपल्या व्यवसायाची व मासेमारीची सुरुवात करतात. या दिवशी समुद्राला नारळ- श्रीफळ अर्पण केला जातो. नारळ हे शुभसूचक, अपार पिवळटपणा व सर्जनशक्तीचे प्रतीक मानले जाते. या दिवशी नदीपेक्षा सागर पवित्र मानून समुद्राची पूजा केली जाते. कोळी बांधव पारंपरिक गाणी गात, वाजत-गाजत समुद्राकिनारी जातात आणि सोने किंवा हळद-कुंकू व फुलांनी पूजा करून समुद्राला नारळ अर्पण करतात. घरी गोडाधोडाचे जेवण असते, ज्यामध्ये प्रामुख्याने नारळापासून बनवलेले नारळी भात - गोड भात हे मुख्य पक्वान्न बनवले जाते. महाराष्ट्राच्या समुद्रकिनारी भागात नारळी पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग

विशेष



कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

या भागांमध्ये हा सण पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. विशेषतः कोळी समाजाच्या वस्त्यांमध्ये या दिवशी उत्साहाचे वातावरण असते. पारंपरिक पोशाख, कोळी गाणी, नृत्य आणि सजवलेल्या बोटी हे या उत्सवाचे आकर्षण असते.

**नारळी पौर्णिमा आणि पर्यावरणाचा संदेश :** नारळी पौर्णिमा केवळ धार्मिक सण नसून निसर्ग आणि जलस्त्रोतांप्रती आदर व्यक्त करण्याचा संदेशही देते. समुद्र हा लाखो लोकांच्या उपजीविकेचा आधार आहे. त्यामुळे समुद्र स्वच्छ ठेवणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि समुद्री जीवसृष्टीचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आजच्या काळात नारळी पौर्णिमा साजरी करताना पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करणे अधिक महत्त्वाचे झाले आहे.

**नारळी पौर्णिमेचे महत्त्व:** समुद्रदेवता- वरुणाची पूजा केली जाते, समुद्राला नारळ अर्पण केला जातो, मच्छीमारांच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना केली जाते, नवीन मासेमारी हंगामाची सुरुवात करण्याची परंपरा आहे, कोळी समाज बांधवांच्या संस्कृतीचे दर्शन घडते, नारळापासून पारंपरिक पदार्थ तयार केले जातात, समुद्र आणि निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते, सामाजिक आणि सांस्कृतिक एकोपा वाढतो.

मराठी संस्कृती ही समृद्ध आणि संपन्न आहे. मराठी संस्कृतीचे विविध पैलू आपल्याला पाहायला मिळतात, यातीलच एक पैलू म्हणजे मराठी सण. निसगार्ने आपल्याला कायमच भरभरून दिले आहे, यामुळेच बहुतांश मराठी सण हे निसगार्शी व निसगार्तील विविध घटकांची जवळीक साधणारे आहेत. या सणांमध्ये आपण त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करत असतो. महाराष्ट्राला एकूण ७२० किलोमीटरचा सागर किनारा लाभला आहे. म्हणून सागरी खाद्य महाराष्ट्रात चवीने खाल्ले जाते. यामुळे सागर किनारी मासेमारी हा एक प्रमुख व्यवसाय आहे. वषार्तील साधारण नऊ ते दहा महिने मासेमारी चालते. मासेमारी करून त्यांचा व्यवसाय




करणे, यावर कोळी बांधव आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

पावसाळ्याला जेव्हा सुरुवात होते, तेव्हा सुरुवातीला सोसाट्याचा वारा आणि विजांचा कडकडाट असतो, मुसळधार पाऊस पडायला सुरुवात होते, यामुळे समुद्रकिनारी वातावरण बदलायला सुरुवात होते. अक्राळविक्राळ लाटा आणि थैमान घालणाऱ्या पावसामुळे समुद्र अशांत होतो, अशा अशांत समुद्रात मासेमारी करणे कोळी बांधवांना सहज शक्य होत नाही. म्हणून पावसाचे सुरुवातीचे दोन महिने, कोळी बांधव विश्रांती घेतात. या काळात ते आपल्या कुटुंबीयांसोबत राहतात. पावसाळ्याच्या सुरुवातीच्या दोन महिन्यात मासेमारी न करण्याचे आणखी एक कारण म्हणजे, यावेळी माशांचा प्रजनन काळ चालू असतो. या दोन महिन्यात माशांना कोणतीही इजा न करता, त्यांची संख्या वाढू देणे, हा एक उद्देश त्यामागे असतो.

शासन पातळीवर पावसाळ्याच्या या दिवसात मासेमारी करण्यासाठी कोळी बांधवांना परवानगी दिली जात नाही. श्रावण महिन्याच्या सुरुवातीला पावसाची संततधार कमी होते. समुद्रातील हालचाली शांत होतात. आता कोळी बांधवांना वेध लागतात ते नारळी पौर्णिमेचे. नारळी पौर्णिमेच्या आधी, कोळी बांधव आपल्या बोटीची डागडुजी व रंगरंगोटीची कामे पूर्ण करतात. मासेमारीसाठी लागणाऱ्या जाळीची दुरुस्ती करतात. तसेच मासेमारी करण्यासाठी लागणाऱ्या इतर साहित्याची जमवाजमा करतात.

**नारळी पौर्णिमा साजरी करण्याची पारंपारिक पद्धत:** नारळी पौर्णिमे दिवशी सर्व कोळी बांधव, आपल्या कुटुंबीयांसोबत पारंपारिक वेशात आणि पारंपारिक लोकगीत म्हणत, वाजत गाजत मिरवणुका काढतात. संध्याकाळी या मिरवणुका सागर किनारी पोहोचतात. यावेळी कोळी बांधव त्यांच्या छान रंगरंगोटी केलेल्या व पताका लावून सजवलेल्या बोटीही सागरावर आणतात. किनारी पोहोचल्यानंतर, सर्व कोळी बांधव एकत्र जमून दयार्ची यथासांग पूजा करतात, प्रार्थना करतात. तसेच त्यांच्या बोटींचीही मनोभावे श्रद्धेने पूजा करतात व त्यांच्या प्रतीही कृतज्ञता व्यक्त करतात. यानंतर समुद्राला नारळ अर्पण केला जातो. श्रावणी पौर्णिमेला सर्व कोळी बांधव एकत्र जमून, समुद्राला नारळ अर्पण करून, पुन्हा मासेमारी चालू करतात, म्हणून या पौर्णिमेला नारळी पौर्णिमा म्हणतात. यावेळी कोळी बांधव दर्याला गाऱ्हान घालतात की, "इथून पुढे मासेमारी करताना भरपूर मासे मिळू देत, खोल समुद्रात जाऊन मासेमारी करताना, कोणतीही नैसर्गिक आपत्ती येऊ नये, कुणालाही इजा होऊ नये, मासेमारीला गेलेले कोळी बांधव सुखरूप आपल्या घरी परतु देत." काल्यार्ची एकवीरा देवी ही कोळी बांधवांची आराध्य देवता आहे.

नारळी पौर्णिमेला समुद्रात नारळच का अर्पण करतात? तर याबद्दल बऱ्याच अख्यायिका ऐकायला मिळतात. पण याबद्दल माझं वैयक्तिक मत असं आहे की, सागरी किनाऱ्यावर तसं पाहिलं तर, इतर कोणत्याही फळांपेक्षा नारळाच्या झाडांचे प्रमाण भरपूर आढळते. नारळाच्या झाडाच्या वाढीसाठी लागणारे पोषक वातावरण किनारी भागात आहे. यामुळेच नारळ हे फळ कोळी बांधवांना वर्षभरात केव्हाही सहजतेने उपलब्ध होऊ शकते. तसेच नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष असेही म्हणतात. नारळाला श्रीफळ असंही म्हणतात. पूजांमध्ये नारळाला खास असे स्थान आहे, तसेच नारळ शुभसूचकही मानतात.

**पारंपारिक पक्वान:** नारळी पौर्णिमेनिमित्त खास नारळापासून बनवलेले पदार्थ पाहायला मिळतात. हेच पदार्थ, समुद्रालाही पूजेवेळी अर्पण करतात. सर्व कोळी बांधव नारळापासून बनवलेले हे पदार्थ मोठ्या आवडीने खातात. यामध्ये खास ओल्या नारळापासून बनवलेले करंज्या, नारळी भात व नारळवडी या पदार्थांचा समावेश होतो.

**नारळी पौर्णिमा सणांची पारंपारिक गाणी:** लहानपणापासून विविध कोळीगीतांनी कायमच मनात घर केले आहे. वेगळ्या चालीची आणि बोलीची कोळीगीते नेहमीच गुणगुणावीशी वाटतात. नारळी पौर्णिमेच्या दिवशी, सर्व आबालवृद्ध कोळी बांधव हीच पारंपारिक कोळीगीते गातात आणि वाजत गाजत पूजेसाठी दयार्ला जातात. महाराष्ट्रात मुंबईमध्ये कोळी समाज मोठ्या प्रमाणात आहे. मुंबईमध्ये साधारण वीस कोळीवाडे आहेत. येथे मोठ्या प्रमाणात मासेमारी केली जाते. मुंबईमध्ये असणाऱ्या विविध साधनसामग्रीमुळे येथे माशांचा व्यापार भरपूर होतो. मुंबईमधून बरेचसे मासे निर्यात केले जातात, तर काही ठराविक मासे आयातही होतात. कोळी समाजबांधव हा खूप कष्टाने मासेमारी करून, आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. नारळी पौर्णिमा सण हा त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा उत्सव आहे. खूप उत्साहाने ते हा सण साजरा करतात आणि समुद्राप्रती त्यांच्या मनी असणाऱ्या कृतार्थ भावना ते आनंदाने सहकुटुंब व्यक्त करतात. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

- ९६९९८३६७१७

# बालपणीच्या आठवणीत विणलेला राखीचा धागा..

विशेष



भावना पंधरे
चंद्रपूर



श्रावणाची चाहूल लागली की मनाच्या कोपऱ्यात जपून ठेवलेल्या बालपणीच्या आठवणी अलगद जाग्या होतात. अंगणात पडलेला पावसाचा सडा, मातीची दरवळ, आईच्या हातचा गोड सुगंध आणि त्या सगळ्यात मनाला सर्वाधिक ओढ लावणारा सण "रक्षाबंधन" राखीचा तो नाजूक धागा मनाच्या गाभाऱ्यात बालपणाशी एक अतुट नात बांधून ठेवतो.

लहानपणी रक्षाबंधन म्हणजे आमच्यासाठी आनंदाची पर्वणीच असायची. काही दिवस आधीपासूनच बहिणींची राखी निवडण्याची लगबग सुरू व्हायची रंगीबेरंगी, चंदेरी, मोत्यांनी सजलेल्या. त्या दिवशी घरात एक वेगळीच प्रसन्नता असायची आई क्षणाचं ताट सजवायची. कुंकवाचा टिळा, अक्षता दिवा आणि मिठाई हे पाहताना मन आनंदाने भरून घ्यायचं बहिण भावाच्या कपाळावर टिळा लावायची, औक्षण करून प्रेमाने त्याच्या मनगटावर राखी बांधायची त्या छोट्याशा धाग्यात कितीतरी मोठी स्वप्न गुंफलेली असायची भावाने सदैव सुखी राहावं संकटापासून दूर राहावं आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर त्याला यश मिळावं..!

राखी बांधून झाली की भावाच्या हातून मिळणारी ओवाळणीची भेट म्हणजे बहिणींसाठी जणू एखादा अमूल्य खजिनाच. भेट किती मूठ मोठी आहे यापेक्षा ती भावाने प्रेमाने दिली आहे यालाच अधिक महत्त्व असायचं. त्या छोट्याशा भेटीतही प्रेमाचा अथांग सागर सामावलेला असे.

एकमेकांची तक्रार करणारे भाऊ बहीण राखीच्या एका धाग्याने पुन्हा एकमेकांचे जिवलग मित्र बनायचे. बालपणातली ती भांडणेही किती निरागस होती? राग पाच मिनिटांचा आणि प्रेम मात्र आयुष्यभराचं...

काळ पुढे सरकला अंगण मोठं होत गेलं आणि बालपण कुठेतरी मागे राहिले. हातावर बांधलेली राखी आजही असते पण तिच्या सोबतचे ते निरागस दिवस परत येत नाही. पूर्वी रोज भेटणारे भाऊ-बहीण आज आपापल्या संसारात जबाबदाऱ्यात आणि धावपळीत गुंतलेले असतात. भेटी कमी झाल्या संवाद कमी झाला पण राखीचा धागा मात्र अजूनही तितकाच घट्ट आहे.

खरंतर राखी हा केवळ रेशमी धागा नाही ती बालपणीच्या असंख्य आठवणींची गाठ आहे. ती नात्याच्या विश्वासाची खून आहे दूर गेलेल्या दिवसांना पुन्हा जवळ आणणारी एक भावस्पर्शी "हाक" आहे. वर्ष बदलतात माणसं मोठी होतात घर बदलतात आयुष्याच्या वाटा वेगळ्या होतात पण बालपणीच्या आठवणीत विणलेला राखीचा धागा कधीच जुना होत नाही तो प्रत्येक रक्षाबंधनाला मनाच्या कप्प्यातून अलगद बाहेर येतो आणि सांगून जातो!


रेशीम धाग्यात गुंफले
बालपणाचे क्षण सारे,
प्रेम भाऊ बहिणीचे
किती गोड किती न्यारे.

*अंतरे वाढली जरी*
*माया कधी न संपते,*
*राखीच्या या धाग्यामध्ये*
*अख्खे आयुष्य जपते.*

- ९५११७७४११३

# रक्षाबंधन-नारळी पौर्णिमा

विशेष



डॉ. प्रकाश पांडे, वाशीम




सरी घेऊन आलेला श्रावण बहरलेल्या हिरव्यागार निसर्गात सृजनात्मक महिना गणला जातो भारतीय अनेक सणाची सुरुवात होते त्यात नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी हे महत्त्वाचे समजले जातात. भावा बहिणींचा पवित्र रक्षाबंधन सण सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात येतो. श्रावणातील पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस आली तर रक्षाबंधन हा पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी साजरा करतात.

बहिण भावाच्या अतूट प्रेमाची आठवण करून देणारा आनंदाचा दिवस मानून बहिण भावाला राखी बांधते याला पवित्ररोपण असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, भावाने आपले रक्षण करण्यासाठी यामागची मंगल मनोकामना असते. उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावाला दिर्घायुष्य व त्याच्या सुखाची कामना करते. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारत रक्षाबंधन सणातून स्नेह व परस्परांबद्दल प्रेम वृध्दिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली. रक्षाबंधन म्हणजे राखीला साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन आहे. औक्षण करताना ओवाळणीच्या ताटातील वसतुंचे सुद्धा महत्त्व आपल्या संस्कृतीत सांगितले आहे, भाळावर लावलेला कुंकुम तिलक दिर्घायुष्य आणि शुभतेचा संदेश देतो,तर श्रीफळ हे लक्ष्मीचं प्रतिक असून सुखसमृद्धी, प्रगती स्तोत्र वाढण्यासाठी आहे आणि दीपक हा त्याच्या तेजाने भोवतालची नकारात्मकता घालवण्यासाठी आहे.

यामध्ये येणाऱ्या प्रत्येक बाबींचे महत्त्व विशद केले आहे. या दिवशी आपल्या सख्ख्या भावा सोबतच भावा समान मानलेल्या भावाला बहिणी राखी बांधून आपलं प्रेमाचं नातं व्यक्त करतात, निस्वार्थ प्रेम म्हणजे भावा बहिणीचं नातं.

आपल्या संस्कृतीत स्त्री सन्मान हा सुद्धा यातून दिलेला उपदेश आहे. संस्कृती हेही सांगते की जिथे स्त्रीचा मानसन्मान पूजा सत्कार होतो तिथे पुढे येणारी पिढी उत्तम दर्जाची तयार होते. संस्कृतीतून हाच विचार लहाणपणापासूनच

समाजामध्ये या अशा अनेक सणांद्वारे रूजवील्या जातो.

राखी या शब्दातच रक्षण करण्यासाठी संकेत आहे, कुठल्याही कर्तबगार, धाडसी व्यक्तीने याचक, दुर्बल, वृद्ध, आजारी, अपंग व अबलांचे रक्षण करणे हा धर्म आहे. राखी पौर्णिमेप्रमाणेच नारळी पौर्णिमा म्हणून याचे विशेष महत्त्व आहे.

पावसाळा कमी होत आला की समुद्र शांत होतो, यादिवशी समुद्रकिनारी वास्तव्यास असलेले आणि विशेष करून कोळी बांधव वरुणदेवतेप्रीत्यर्थ सागराची पूजा करुन नारळ अर्पण करतात, हा सण त्यांच्या दृष्टीने फार महत्वाचा असतो, पावसाळ्यात समुद्र प्रचंड खवळलेला असतो,बोटी जहाजांची वर्दळ बंद असते, जहाजं नौका सुरक्षित राहावे म्हणून समुद्राला नारळ आणि सोन्याचा नारळ अर्पण करण्याची प्रथा आहे म्हणून या सणाला नारळी पौर्णिमा हे नाव पडले. या सणाला नारळाचे गोडधोड पदार्थ करून, मिरवणूका काढून आनंदाने उत्साहात साजरा करतात, जलदेवतेला कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पण हा सण साजरा केला जातो अशी मान्यता आहे.